खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर, ता.खेड जि.पुणे ४१०५०५

# वाणिज्य विभाग

## द्वितीय वर्ष वाणिज्य

## सत्र ४

## विषय

## कंपनी कायद्याचे घटक–II

## प्रकरण १

## कंपनीचे व्यवस्थापन

# प्रकरण पहिले

# कंपनीचे व्यवस्थापन/MANAGEMENT OF COMPANY

## प्रास्ताविक (Introduction)

सर्वसाधारणपणे असे दिसते की, कंपनीचे प्रत्यक्ष मालक हे भागधारक असतात आणि त्यांना कंपनीच्या व्यवहाराचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार असतो. ज्या व्यक्तींचा समूह कंपनीचे व्यवस्थापन आणि प्रशासनाचे व्यवहार सांभाळतो त्यांना 'संचालक मंडळ' असे मानले जाते. हे संचालक मंडळ कंपनीचे व्यवस्थापन आणि प्रशासन करण्यासाठी जबाबदार मानले जाते. कंपनीचे संचालक मंडळ हे तिचे व्यवस्थापन आणि प्रशासन यांमधील उच्चस्तरीय रचना असते. हे मंडळ व्यवस्थापकीय संचालक आणि सचिव यांची नियुक्ती करते. कंपनी अधिनियमानुसार कंपनीच्या व्यवस्थापनासाठी आणि प्रशासनासाठी संचालक मंडळ हे आवश्यक असते. इतर प्रकारच्या व्यवस्थापकीय व्यक्तींची नियुक्ती ही वैकल्पिक असते. कंपनी त्यांची नियुक्ती करू शकते किंवा करतही नाही. या प्रकरणामध्ये आपण कंपनीचे व्यवस्थापन करणारे संचालक मंडळ, संचालक व त्यांची नियुक्ती, पात्रता, अधिकार, कर्तव्ये, मानधन यांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

## 1.1 संचालक मंडळ/BOARD OF DIRECTORS

(Board of Directors : Meaning and Definition)

**संचालक मंडळ - अर्थ :**

कंपनीच्या कायद्याने तयार केलेली ही कृत्रिम व्यक्ती आहे. ती स्वतः कोणतेही अधिकार वापरू शकत नाही. हे अधिकार कंपनीच्या वतीने संचालक मंडळ वापरत असतात. कंपनीचे मालक/स्वामित्व म्हणजेच भागधारक संख्येने असंख्य असतात व विखुरलेले असतात. त्यामुळे ते कंपनीच्या दैनंदिन व्यवस्थापनात प्रत्यक्ष भाग घेऊ शकत नाहीत.

कंपनीचे व्यवस्थापन चांगले व कार्यक्षम व्हावे म्हणून ते आपले प्रतिनिधी निवडून देतात; त्यांना 'संचालक' असे म्हणतात.

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 149 नुसार, प्रत्येक कंपनीला 1 संचालक मंडळ असले पाहिजे आणि त्या मंडळावर सार्वजनिक कंपनीच्या बाबतीत किमान 3 संचालक, खाजगी कंपनीच्या बाबतीत किमान 2 आणि एकल व्यक्ती कंपनीच्या बाबतीत किमान 1 संचालक असावेत. संचालक मंडळावर कमाल 15 संचालक असावेत. विशेष ठराव संमत करून कंपनी यापेक्षा अधिक संचालक नेमू शकते. संचालक मंडळात किमान 1 महिला संचालक असावी. भागबाजारात नोंदणी झालेल्या प्रत्येक सार्वजनिक कंपनीत (Listed Public Company) एकूण संचालक संख्येच्या किमान एक-तृतीयांश संचालक हे स्वतंत्र

संचालक (Independent Director) असावेत. केंद्र सरकार स्वतंत्र संचालकाची किमान संख्या ठरवून देईल.

**संचालक मंडळ - व्याख्या :**

1) "कंपनीच्या संबंधात कंपनीच्या संचालकांचा एकत्रित समुदाय म्हणजे 'संचालक मंडळ' होय."

(कंपनी कायदा, 2013 (कलम 2))

2) "जेव्हा संचालक एकत्र मिळून सामूहिकरीत्या काम करतात त्यांना 'संचालक मंडळ' असे म्हणतात."

## संचालक मंडळाचे अधिकार (Powers of Board of Directors)

**(अ) संचालक मंडळाचे अधिकार (कलम 179) :**

(1) कंपनीचे संचालक मंडळ असे सर्व अधिकार वापरण्यास सक्षम असेल आणि अशा सर्व कृती व गोष्टी करू शकेल की जे कंपनीच्या दृष्टीने अधिकृत असेल.

(2) कंपनी संचालक मंडळाद्वारा केल्या गेलेल्या अशा कोणत्याही कृतीसंदर्भात सर्वसाधारण सभेत नियम तयार करू शकत नाही की ज्यामुळे मंडळाची एखादी कृती अवैध ठरेल. जर त्या कृतीसंदर्भात नियम नसेल तर ती कृती कायदेशीर मानली जाईल.

(3) कंपनीचे संचालक मंडळ कंपनीतर्फे पुढील अधिकारांची अंमलबजावणी मंडळाच्या सभांमध्ये मंजूर ठरावाद्वारे करील. मुख्यतः -

(i) भागधारकांना त्यांच्या भागांवरील अदेय वित्ताच्या संदर्भात मागणी करणे.

(ii) कलम 6 अनुसार प्रतिभूतींची अधिकृत पुनर्खरेदी करणे.

(iii) भारतात किंवा भारताबाहेर कर्जरोखे, ऋणपत्र यांचे प्रचालन करणे.

(iv) पैसे कर्जाऊ घेणे.

(v) कंपनीचा निधी गुंतविणे

(vi) कर्ज देणे किंवा हमी देणे किंवा कर्जाबाबत तारण देणे.

(vii) वित्तीय निवेदन आणि मंडळाचा अहवाल मंजूर करणे.

(viii) कंपनीचा व्यवसायविस्तार करणे.

(ix) कंपनीचे एकत्रीकरण, विलीनीकरण किंवा पुनर्रचनेला मान्यता देणे.

(x) एखादी कंपनी ताब्यात घेणे किंवा दुसऱ्या कंपनीला नियंत्रित ठेवणारा भरीव हिस्सा संपादित करणे.

(xi) पुढे नमूद केल्याप्रमाणे कोणतीही अन्य गोष्ट

(4) या कलमात नमूद केलेले मंडळाचे जे अधिकार सर्वसाधारण सभेमध्ये कोणत्याही प्रकारची बंधने आणि अटी लादण्याचा अधिकार या कलमानुसार कंपनीला प्राप्त झाला आहे असे समजले जाऊ नये.

**(ब) कंपनीचे संचालक मंडळ सत्य धर्मादाय आणि इतर निधींना वर्गणी देऊ शकेल (कलम 181):**

या कलमातील तरतुदींनुसार जर धर्मादाय व इतर निधींना वर्गणी द्यायची असेल तर कंपनीच्या सर्वसाधारण सभेमध्ये अशा स्वरूपाच्या वर्गणीसाठी पूर्वमंजुरी असणे आवश्यक राहील. अर्थात, कोणत्याही वित्तीय वर्षाच्या एकूण सरासरी रकमेच्या निव्वळ नफ्यातील 5 टक्क्यांपेक्षा जास्त रक्कम असेल तर ही परवानगी आवश्यक असेल.

**(क) संचालक मंडळ आणि इतर व्यक्तींचा राष्ट्रीय संरक्षण निधी इत्यादी वर्गणी देण्याचा अधिकार (कलम 183) :**

(1) कोणत्याही कंपनीचे संचालक मंडळ किंवा कोणतीही व्यक्ती किंवा अधिकारी जी कंपनीच्या संचालक मंडळाचे किंवा कंपनीचे अधिकार सर्वसाधारण सभेमध्ये वापरत आहेत ते कलम 180, 181 आणि 182 नुसार योग्य वाटते तेवढी रक्कम राष्ट्रीय संरक्षण निधीमध्ये वर्गणी म्हणून देईल किंवा राष्ट्रीय संरक्षणासाठीच्या केंद्र सरकारने मान्यता दिलेल्या इतर कोणत्याही निधीला वर्गणी देईल.

(2) प्रत्येक कंपनी तिच्या नफा-तोटा खात्यात तिने पोटकलम (1) मध्ये उल्लेखिलेल्या निधीला वित्तीय वर्षात ज्यांच्याशी संबंध आहे तेथे दिलेल्या एकूण रक्कम किंवा रकमा प्रकट करील.

## संचालक मंडळाच्या अधिकारावरील मर्यादा (कलम 180)/(Restrictions on Powers of Board)

कंपनी पुढील प्रकारचे अधिकार विशेष ठरावाद्वारे संमती दिल्यानंतरच वापरू शकते :

(1) कंपनीचा उद्योग भाड्याने देणे किंवा विकणे.

(2) एकत्रीकरण अथवा विलीनीकरणातून मिळालेल्या रकमेचा विश्वस्त संस्थेशिवाय इतर प्रतिभूतीत विनियोग करणे.

(3) कंपनीचे वसूल भाग-भांडवल अधिक मुक्त राखीव निधी यापेक्षा जास्त कर्ज काढणे, विशेष ठरावात अशा कर्जाच्या रकमेचा उल्लेख असावा.

### राजकीय पक्षांना द्यावयाच्या देणगीवरील निर्बंध व मर्यादा (कलम 182)/(Prohibition and Restrictions Regarding Political Contributions)

सरकारी कंपनी सोड्न आणि तीन वर्षांपेक्षा कमी वर्षे अस्तित्वात असलेली कंपनी सोडून इतर कंपन्या राजकीय पक्षाला कितीही रक्कम देऊ शकतात. अर्थात, अशी रक्कम त्या कंपन्यांच्या मागील तीन वर्षांच्या सरासरी नफ्याच्या 7.25 ते 7.50% पेक्षा अधिक नसावी. या कलमातील तरतुदीचा भंग करून जर कंपनीने राजकीय पक्षांना देणगी दिली तर ती कंपनी दंडास पात्र ठरेल तसेच कसूरदार अधिकारी दंडास पात्र ठरेल. अशी शिक्षा सहा महिने कैद अथवा देणगी रकमेच्या 5 पट रक्कम इतकी असू शकते.

## 1.2 संचालक/DIRECTORS

### A) संचालक : अर्थ आणि व्याख्या/(Director : Meaning and Definitions)

1) "कंपनीमध्ये संचालक म्हणून स्थान धारण करणारी व्यक्ती, मग ती कोणत्याही नावाने ओळखली जाते त्या व्यक्तीला 'संचालक' असे म्हणतात.' (भारतीय कंपनी कायदा, कलम 2 (13))

2) "कंपनी व्यवसायाचे व्यवस्थापन, पर्यवेक्षण, संचालन आणि मार्गदर्शन करण्यासाठी कंपनीच्या सभासदांनी आपल्यातूनच निवडून दिलेल्या प्रतिनिधींना 'संचालक' असे म्हणतात."

3) "कंपनी कायद्यानुसार संचालक म्हणजे अशी व्यक्ती की जी कायद्यातील तरतुदीनुसार कंपनीचे व्यवस्थापन करण्यासाठी नियुक्त केलेली किंवा निवडलेली असते.”

("Director is a person appointed or elected according to law authorised to manage the company.")

### B) संचालकाचे कायदेशीर/वैधानिक स्थान/(Legal Position of Directors)

1. संचालकांचे कंपनीतील 'प्रतिनिधी' म्हणून स्थान (As an Agent) :

कंपनी ही कायद्याने निर्माण केलेली कृत्रिम व्यक्ती आहे. त्यामुळे ती स्वतः कोणतेही कार्य करू शकत नाही. म्हणून कंपनीला आपली कामे कोणत्याही मानवी मध्यस्थांमार्फत करावी लागतात. कंपनीचे संचालक हेच कंपनीचे प्रतिनिधी' (Agent) म्हणून काम करतात. प्रतिनिधी या नात्याने संचालक कंपनीचा व्यवसाय सांभाळतात.

2. संचालकाचे कंपनीचे 'विश्वस्त' म्हणून स्थान (As a Trustee):

संचालकांना कंपनीचे विश्वस्त' देखील समजण्यात येते. कंपनीची सर्व मालमत्ता मालक (Guardian) आणि रक्षक (Custodian) या नात्याने त्याच्या ताब्यात असते. कंपनीच्या मालमत्तेची योग्य ती काळजी घेणे, तिचे संरक्षण करणे हे 'विश्वस्त' या नात्याने त्याचे कर्तव्य आहे. कंपनीची मालमत्ता

व पैसा त्यांना कंपनीच्या हितासाठीच वापरावा लागतो. संचालकांनी त्याचा गैरवापर केल्यास, वैयक्तिक स्वार्थासाठी उपयोग केल्यास त्यांना जबाबदार धरले जाते व त्याची भरपाई करून द्यावी लागते. कंपनीने दिलेले अनेक अधिकार त्यांना 'विश्वस्त' या नात्याने वापरावे लागतात. सर्व व्यवहार त्यांना एखाद्या प्रतिनिधी' सारखे कंपनीच्या नावेच करावे लागतात. म्हणून त्यांना 'विश्वस्तसम' (Quasi Trustee) म्हणता येईल.

3. संचालकाचे कंपनीतील 'व्यवस्थापकीय भागीदार' म्हणून असलेले स्थान /(As a Managing Partner)

कंपनीच्या व्यवस्थापन कार्यातील व्यवस्थापकीय भागीदार' म्हणून संचालकाकडे पाहिले जाते. कंपनीच्या सर्व कारभारात व्यवस्थापन करणे आणि स्वतःसाठी व भागधारकांसाठी नफा मिळविणे हे काम संचालकांना करावे लागते. इतर भागीदारांना 'निष्क्रिय भागीदार' (Sleeping Partner) तर संचालकांना 'सक्रिय भागीदार' (Active Partner) समजले जाते. सक्रिय भागीदार म्हणून तो कंपनीची ध्येयधोरणे ठरवितो, नियोजन करतो, त्यांची अंमलबजावणी करतो व सर्व कारभारावर नियंत्रण ठेवतो. संचालक हे व्यवस्थापकीय भागीदार असले तरी त्यांची कृत्ये इतर भागधारकांवर बंधनकारक नसतात, तर ती कृत्ये कंपनीवर बंधनकारक असतात.

4. संचालक कंपनीरूपी शरीराचे अवयव आहेत :

आधुनिक संचालक हे प्रतिनिधी आणि विश्वस्तापेक्षा अधिक महत्त्वाचे समजले जातात. संचालक मंडळाला कंपनीचा मेंदू (Brain) समजले जाते. कंपनीरूपी शरीर मेंदूद्वारे पाहिजे ते काम करू शकते.

लॉर्ड पार्कर म्हणतात, "कंपनी ही मानवी शरीरासारखी आहे. तिला मेंदू व नर्व्ह सेंटर आहे की ती पाहिजे ते नियंत्रित करू शकते. कंपनीला हात-पाय आहेत व मेंदूच्या सूचनेप्रमाणे ते एखाद्या अवजाराप्रमाणे काम करतात. यावरून संचालकाचे स्थान समजून येते."

## C) संचालकांचे प्रकार/(Types of Directors)

1. कार्यकारी संचालक (Executive Directors) :

जे संचालक कंपनीच्या सेवेत पूर्ण वेळ असतात अथवा जे कंपनीच्या दैनंदिन कामात लक्ष घालतात अशा संचालकाला 'कार्यकारी संचालक' असे म्हणतात. कार्यकारी संचालक हे व्यवस्था-संचालक अथवा पूर्ण वेळ संचालक असतात.

2. अकार्यकारी संचालक (Non-Executive Directors) :

कार्यकारी संचालक सोडून इतर संचालकांना 'अकार्यकारी संचालक' म्हणता येईल. असे संचालक कंपनीच्या दैनंदिन कामकाजात भाग घेत नाहीत. त्यामुळे कंपनीच्या नित्याच्या कामाची कल्पना त्यांना नसते. असे संचालक फक्त बोर्ड मिटिंगमध्ये उपस्थित राहतात. कालिक अहवालातून त्यांना कंपनीच्या प्रगतीविषयी परिचित केले जाते.

3. कंपनीचे पहिले संचालक (First Directors) [कलम 152 (1)] :

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 152 (1) नुसार, कंपनीचे पहिले संचालक घटनापत्रकावर सह्या करणाऱ्या व्यक्ती (Subscribers of a Memorandum) नेमतात. कंपनीच्या नियमावलीत सहसा त्यांचा उल्लेख केलेला असतो. जर कोणत्याही व्यक्तींना ‘पहिले संचालक म्हणून नेमण्यात आले नसेल तर घटनापत्रकावर सह्या करणाऱ्या व्यक्ती (Individuals) पहिले संचालक बनतात. पहिले संचालक कंपनीच्या पहिल्या वार्षिक सर्वसाधारण सभेपर्यंत नियुक्त केले जातात.

4. निवडलेले संचालक (Elected Directors) :

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 152 (2) नुसार, कंपनीच्या प्रत्येक संचालकाची निवड सर्वसाधारण सभेने केलेली असावी.

5. अतिरिक्त संचालक (Additional Directors) [कलम 161 (1)] :

कंपनी कायदा, 2013 च्या कलम 161 (1) नुसार, कंपनीच्या नियमावलीने संचालक मंडळाला 'अतिरिक्त संचालक नेमण्याचा अधिकार दिलेला असतो. ज्या व्यक्तीची सर्वसाधारण सभेत संचालक म्हणून निवड होऊ शकली नाही अशी व्यक्ती सोडून कोणत्याही इतर व्यक्तीला 'अतिरिक्त संचालक म्हणून नेमता येईल.

6. वैकल्पिक/पर्यायी संचालक (Alternate Directors) [कलम 161 (2)] :

नियमावलीने अधिकार दिलेला असल्यास संचालक मंडळाला विशिष्ट परिस्थितीत वैकल्पिक/पर्यायी संचालक नेमता येतात. जर एखादा संचालक तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी भारताबाहेर गेला असेल तर त्याच्या अनुपस्थिती काळात संचालक मंडळाला वैकल्पिक संचालक नेमता येतो.

7. नामनिर्देशित संचालक (Nominee Directors) [कलम 161 (3)] :

नियमावलीच्या अधीन राहून संचालक मंडळ एखाद्या संस्थेने (कोणत्याही कायद्यानुसार आवश्यक) केंद्र अथवा राज्य सरकारने संचालक म्हणून नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीला संचालक म्हणून नियुक्त करू शकते.

8. तात्पुरत्या रिकाम्या झालेल्या जागेवर होणारी संचालक नेमणूक (नैमित्तिक संचालक) [कलम 161 (4)] :

एखाद्या संचालकाचा कार्यकाल संपण्यापूर्वीच मृत्यू, पदत्याग, पदमुक्ती, अपात्रता या कारणांमुळे संचालकाची जागा रिकामी झाली असेल तर त्या रिकाम्या जागेवर नेमलेल्या संचालकास 'नैमित्तिक संचालक' असे म्हणतात.

9. स्वतंत्र संचालक (Independent Director) [कलम 2 (47)] :

स्वतंत्र संचालक म्हणजे कलम 149 च्या उपकलम (6) मध्ये सांगितल्याप्रमाणे नेमलेली व्यक्ती होय. उपकलम 6 ते 13 मध्ये स्वतंत्र संचालकाच्या संदर्भात तरतुदी दिलेल्या आहेत :

(1) व्यवस्थापकीय संचालक, पूर्ण वेळ संचालक व नामनिर्देशित संचालक सोडून असलेले इतर संचालक होय.

(2) अशी व्यक्ती संचालक मंडळाच्या मते, अनुभवी, होतकरू व एकाग्र चित्त असणारी हवी.

(3) अशी व्यक्ती कंपनीच्या प्रवर्तकापैकी तसेच प्रवर्तक व इतर संचालकाशी की ज्यांचे हितसंबंध कंपनीमध्ये आहेत अशा व्यक्तींशी संबंधित नसावी.

(4) अशी व्यक्ती कंपनीच्या महत्त्वाच्या व्यक्तींच्या नातेसंबंधापैकी (KMP) नसावी.

10. छायांकित संचालक (Shadow Director) :

एखादी व्यक्ती जी मंडळाद्वारे नियुक्त केली जात नाही पण संचालक मंडळ त्यांच्या मार्गदर्शनानुसार कृती करते ती व्यक्ती कंपनी संचालक म्हणून जबाबदार असते. म्हणून त्याला कंपनी अधिनियमानुसार छायांकित संचालक असे म्हटले जाते.

11. महिला संचालक (Women Director) [कलम 149 (1)] :

सदर कलमानुसार कंपनीची नोंदणी (Incorporation) झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत पुढे नमूद केलेल्या कंपन्यांना किमान 1 महिला संचालक नियुक्त करावी लागते.

(1) भागबाजारात नोंदणी केलेल्या प्रत्येक कंपनीला (Listed Companies).

(2) इतर सार्वजनिक कंपन्यांना की, ज्याचे वसूल भागभांडवल ₹ 100 कोटी किंवा त्यापेक्षा अधिक आहे किंवा ज्यांची उलाढाल (Turnover) ₹ 300 कोटी किंवा त्यापेक्षा अधिक आहे.

12. हितसंबंध असलेले संचालक (Interested Director) :

ज्या संचालकाचे हितसंबंध कंपनीच्या व्यवहारामध्ये अथवा करारामध्ये गुंतलेले असतात अशा संचालकाला 'हितसंबंध असलेले संचालक' असे म्हणतात. अशा संचालकाला हितसंबंध असलेल्या व्यवहारावर अथवा करारावर चर्चा चालू असताना आपले मत प्रदर्शित करण्याचा अथवा मतदान करण्याचा अधिकार नसतो. अशा संचालकाने आपला हितसंबंध संचालक मंडळाला कळविला पाहिजे. अशा हितसंबंधाचे वेगळे रजिस्टर ठेवले पाहिजे. (कलम 189)

## D) संबंधित पक्षाशी व्यवहार (कलम 188)/(Related Party Transactions)

(1) संचालक मंडळाच्या संमतीशिवाय कंपनी संबंधित पक्षाशी पुढील बाबीत व्यवहार/करार करू शकत नाही.

(अ) कोणत्याही वस्तू अथवा सामग्रीची खरेदी-विक्री अथवा पुरवठा.

(ब) कोणत्याही प्रकारची मालमत्ता खरेदी करणे अथवा त्याची विल्हेवाट लावणे.

(क) मालमत्ता भाडे कराराने देणे.

(ड) कोणत्याही प्रकारच्या सेवा देणे अथवा उपलब्ध करून देणे.

(इ) वस्तू, सामग्री अथवा सेवेच्या खरेदी-विक्रीसाठी एजंटची नियुक्ती करणे.

(ई) संबंधित पक्षाला कंपनीमध्ये किंवा तिच्या साहाय्यक कंपनीमध्ये लाभाचे पद देणे.

(उ) कंपनीच्या प्रतिभूतीसाठी भाग-विमा (Underwriting) स्वीकारणे.

(2) वरीलपैकी कोणत्याही प्रकारचा व्यवहार/करार केला असल्यास त्याचा उल्लेख सभासदांना द्यावयाच्या संचालक मंडळाचा सहभाग अहवालात करणे गरजेचे आहे. सोबत अशा व्यवहाराचे/कराराचे समर्थन केलेले असावे.

(3) संचालक मंडळाच्या संमतीशिवाय तसेच सर्वसाधारण सभेत विशेष ठरावाद्वारे मंजुरी मिळाल्याशिवाय केलेले असे व्यवहार/करार रद्दबातल ठरतील अथवा अशा व्यवहारामुळे/करारामुळे होणाऱ्या नुकसानीची हमी संबंधित संचालकाने कंपनीला द्यावी.

(4) पूर्वग्रहदूषित न ठेवता कंपनी अशा संबंधित संचालकावर/अधिकाऱ्यावर कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल कारवाई करू शकते. अशा दोन्ही व्यक्तींवर एक वर्षापर्यंत कैद अथवा ₹ 25,000 पर्यंत दंड अशी शिक्षा होऊ शकते. दंडाची रक्कम 5 लाख रुपयांपर्यंत वाढविली जाऊ शकते.

## 1.3.संचालकांची नेमणूक (कलम 152) /

## APPOINTMENT OF DIRECTORS

(1) कंपनीच्या नियमावलीत जर पहिले संचालक नियुक्त करण्याची तरतूद नसेल तर घटनापत्रकावर सह्या करणाऱ्या व्यक्ती (Individuals) कंपनीचे पहिले संचालक समजले जातील. जोपर्यंत नवीन संचालक नियुक्त केले जाणार नाहीत तोपर्यंत पहिले संचालक कार्यभार सांभाळतील.

(2) प्रत्येक संचालकाची नियुक्ती कंपनी आपल्या सर्वसाधारण सभेत करील.

(3) कलम 154 अंतर्गत संचालक ओळख क्रमांक (DIN) मिळाल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला संचालक म्हणून नेमता येणार नाही.

(4) ज्या व्यक्तीला सर्वसाधारण सभेत संचालक म्हणून नियुक्त करण्याचे ठरले असेल अशा व्यक्तीने आपला संचालक ओळख क्रमांक (DIN) कंपनीकडे दिला पाहिजे तसेच कायद्यानुसार आपण संचालक म्हणून नेमण्यास अपात्र नाही असे निवेदन (Declaration) दिले पाहिजे.

(5) संचालक म्हणून नियुक्त केलेल्या व्यक्तीने संचालक म्हणून काम करण्यास आपण तयार आहोत असे कळविल्याशिवाय म्हणजेच आपली संमती दिल्याशिवाय संचालक म्हणून काम करता येणार नाही. अशी संमती नियुक्त केलेल्या तारखेपासून 30 दिवसांच्या आत कंपनीच्या नोंदणी अधिकाऱ्याकडे कळविली पाहिजे.

**संचालकाच्या नेमणुकीचे इतर प्रकार**

1. स्वतंत्र संचालकाची नेमणूक (कलम 149 (6))

2. लघू भागधारकांनी निवडलेल्या संचालकाची नेमणूक (Appointment of Director Elected by Small Shareholders) (कलम 151)

3. वैयक्तिक मतदान आवश्यक असणाऱ्या संचालकाची नेमणूक (Appointment of Directors to be Vote Individually) (कलम 162)

4. अनुपात पद्धत स्वीकारून संचालक नेमणुकीचा पर्याय (Option to Adopt Principle of Proportional Representation for Appointment of Director) (कलम 163)

5. अतिरिक्त पर्यायी व नामनिर्देशित संचालकाची नेमणूक (Appointment of Additional Director, Alternative Driector and Nominee Director) (कलम 161)

## A) संचालकाची पात्रता (Qualifications of Directors)

(1) सदर व्यक्ती अनैतिक गुन्ह्याबाबत सहा महिन्यांपेक्षा जास्त शिक्षा झालेली नसावी.

2) सदर व्यक्ती करार करण्यास मानसिकदृष्ट्या सक्षम असावी

3) सदर व्यक्ती दिवाळखोर म्हणून घोषित झालेली नसावी.

4) सदर व्यक्तींनी आपल्या भागांवरील हप्ते सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ थकविलेले नसावेत.

5) सदर व्यक्ती कोणत्याही कायद्यानुसार धोकेबाज/लबाड (Forger) ठरविलेली नसावी.

6) कलम 188 नुसार, गेल्या पाच वर्षांत संबंधित पक्षाशी केलेल्या व्यवहारात (Related Party Transactions) दोषी ठरलेली नसावी.

7) एखाद्या कोर्टाने अथवा ट्रॅब्युनलने संचालक निवडीसाठी अपात्र ठरविणारा आदेश काढला असेल आणि तो आदेश अजून अमलात असेल अशा व्यक्तीला संचालक म्हणून नेमता येणार नाही.

## B) संचालकाची अपात्रता (Dis-Qualifications of Directors)(कलम 164)

(1) सक्षम न्यायालयाने मानसिकदृष्ट्या अपात्र ठरविलेली व्यक्ती (Unsound Mind).

(2) न्यायालयाने दिवाळखोर (Insolvent) म्हणून घोषित केलेली व्यक्ती.

(3) ज्या व्यक्तीने दिवाळखोर म्हणून घोषित करावे असा अर्ज केलेला आहे आणि त्या अर्जाचा निकाल अद्याप लागावयाचा आहे.

(4) भारतातील न्यायालयात नैतिक अथवा अनैतिक गुन्ह्याबाबत सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ शिक्षा झालेली व्यक्ती व अशा शिक्षेला पाच वर्षांपेक्षा अधिक काळ न झालेली व्यक्ती.

(5) न्यायालयाने अथवा ट्रॅब्युनलने एखाद्या संचालकाला नेमणुकीस अपात्र ठरविणारा आदेश काढला असेल आणि तो आदेश अजून अमलात असेल अशा व्यक्ती.

(6) ज्या व्यक्तींनी आपल्या भागावरील हप्तेमागणीचे पैसे सहा महिन्यांच्या आत भरले नाहीत अशा व्यक्ती.

(7) कलम 188 नुसार, गेल्या पाच वर्षांत संबंधित पक्ष व्यवहारात (Related Party Transaction) दोषी ठरलेली व्यक्ती.

(8) 18 वर्षांपेक्षा कमी वय असणारी व्यक्ती.

(9) साधारणपणे ठरावाद्वारे संचालक पदावरून काढून टाकलेली व्यक्ती.

(10) न्यायालयाने विकृत/वेडी (Lunatic) म्हणून घोषित केलेली व्यक्ती.

## C) संचालकाचे अधिकार (Powers of Directors)

1. व्यवस्थापन मंडळाचे सर्वसाधारण अधिकार :

कंपनीच्या सर्व कार्याचा आणि कंपनीच्या कायदेशीर बाबींचा व कंपनीच्या सर्व अधिकारांचा वापर करण्याचा अधिकार संचालक मंडळाला आहे. परंतु कंपनीद्वारे सर्वसाधारण सभेत जे अधिनियम, निवेदनपत्रिका आणि नियमावली तयार केली जाते ते तयार करण्याचा अधिकार मंडळाला नाही. सर्वसाधारण सभेत कंपनीद्वारे तयार केलेल्या नियमावलीत जर काही नियम केले असतील आणि ते कायदेशीर असतील तर संचालक मंडळास ते रद्द करण्याचा अधिकार नाही. संचालक मंडळाच्या अधिकाराच्या वापरावर भागधारकांचे मंडळ हे नियंत्रण ठेवते. सर्वसाधारण सभेत भागधारक अधिनियम दुरुस्त करून संचालक मंडळास देण्यात आलेले अधिकार काढून घेऊन ते सभेकडे सोपविले जाऊ शकतात.

2. प्रतिनिधी मंडळाचे अधिकार :

प्रथम संचालकांना देण्यात आलेल्या अधिकारांपैकी एखादा अधिकार एक किंवा एकापेक्षा अधिक व्यक्तींना देण्याचा अधिकार नाही; परंतु जर कंपनीच्या अधिनियमाच्या नियमावलीत जर संचालकांना तसे करण्याचा अधिकार देणारी स्पष्ट तरतूद असेल तर ते अधिकार त्या व्यक्तीकडे सुपूर्द करू शकतात. त्याचे मुख्य कारण असे की, “ज्याला अधिकार दिले आहेत तो स्वतःला अधिक अधिकार देऊ शकत नाहीत.” हे नियम संचालकांनादेखील लागू आहे. परंतु या ठिकाणी याची नोंद घ्यावी.

3. भागभांडवलाच्या वाटपाचे अधिकार :

भागभांडवल वाटपासंबंधीचे अधिकार साधारणपणे संचालक मंडळाच्या ठिकाणी अधिष्ठित असतात. कंपनी अधिनियमचे कलम 69 ते 74 मधील तरतुदीनुसार संचालक मंडळाने ते अधिकार वापरणे आवश्यक आहे. हे अधिकार विश्वासावर आधारित असल्याने संचालकांनी कंपनीच्या फायद्यासाठी योग्य पद्धतीने त्यांचा वापर करणे आवश्यक आहे.

4. भागांची मागणी करण्याचा अधिकार :

जर भागभांडवलाच्या वाटपाच्या वेळी भागांची पूर्ण किंमत दिली तर मागणी करण्यासाठी काहीच शिल्लक नाही त्या वेळी भागधारकाची असलेली जबाबदारी संपुष्टात येते. परंतु भागाची पूर्ण किंमत दिली नसेल तर भागाची न दिलेल्या किमतीची मागणी भरणा करण्यासाठी करावी लागते. संचालक अशी मागणी नियमावलीतील तरतुदीनुसार करू शकतो. संचालक मंडळाच्या योग्य ठरावांतर्गत योग्य पद्धतीने कंपनीच्या हितासाठी अशा प्रकारच्या भागभांडवलाची मागणी करावी लागते.

5. भाग जप्त करण्याचा अधिकार :

जर भागधारकाकडे पैशाची मागणी केली आणि त्याची भागधारकाने परतफेड केली नाही तर कंपनी किंवा कंपनीचे संचालक मंडळ नियमावलीत दिलेल्या तरतुदीनुसार त्याचे भागभांडवल जप्त करू शकतात. या ठिकाणी या बाबींची नोंद घेणे आवश्यक आहे की, कंपनीच्या नियमावलीत त्याबद्दल तरतूद केली असेल तरच संचालक मंडळ त्याचे भाग जप्त करू शकतो.

6. पैसे कंपनीतर्फे कर्जाऊ घेण्याचे अधिकार :

कंपनीचा एक प्रतिनिधी म्हणून कार्य करताना संचालकांना वरील अधिकार दिल्यावर त्यांच्या कंपनीतर्फे करार करून ते पैसे कर्जाऊ घेऊ शकतात. अशा रीतीने कंपनी त्याच्या आधारावर जबाबदार ठरू शकतात. कंपनीचा प्रतिनिधी म्हणून संचालकांची महत्त्वाची कार्ये करार करणे, पराक्रम दस्तऐवज तयार करणे आणि कंपनीतर्फे पैसे कर्जाऊ घेणे ही आहेत.

7. इतर कंपन्यांच्या भागांमध्ये गुंतवणूक करण्याचे अधिकार :

कंपनीचे संचालक मंडळ इतर कंपन्यांच्या भागांमध्ये त्या खाली विहित केलेल्या अटी पूर्ण केल्यावर काही निश्चित मर्यादेपर्यंत गुंतवणूक करू शकतात.

8. संचालक नेमण्यासंबंधीचे अधिकार :

संचालक मंडळ काही विशिष्ट परिस्थितीत संचालक नेमू शकतात, जर संचालक मंडळास कंपनीच्या नियमावलीत संचालकाच्या नेमणुकीचे अधिकार दिले असतील तर अतिरिक्त संचालकाची नेमणूक करू शकतात. त्याशिवाय सार्वजनिक किंवा खाजगी कंपन्या आणि त्याच्या सहयोगी कंपन्यांच्या संचालकाचे पद हे कार्यकालाच्या मुदतीअगोदर रिक्त झाले असेल तर अशा वेळी सर्वसाधारण सभेत संचालक मंडळ त्या रिक्त पदावर नवीन संचालकाची नेमणूक करू शकतो.

9. लाभांशाच्या घोषणेची शिफारस करण्याचे अधिकार:

संचालक मंडळ विशिष्ट दराने लाभांशाच्या घोषणेची शिफारस करू शकते. कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत शिफारस केलेल्या दराने लाभांशाच्या घोषणा मंजूर करू शकते किंवा शिफारस केलेल्या

दरापेक्षा कमी दराने लाभांश मंजूर करू शकते किंवा तो दर रद्द करू शकते. परंतु लाभांशाच्या दरात वाढ करू शकत नाही. ही गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे की, संचालक मंडळाने शिफारस केली नाही तर सर्वसाधारण सभा लाभांश जाहीर करू शकत नाही.

10. कंपनीतर्फे दावा दाखल करण्याचा अधिकार :

संचालकांना साधारणपणे कंपनीतर्फे दावे चालविण्याचे अधिकार दिलेले असतात. जर त्यांना तसे करता येत नसेल किंवा कंपनीच्या नावे कायदेशीर कार्यवाही सुरू करणार नसतील तर दावे चालविण्याचे अधिकार सर्वसाधारण सभेकडे परत जातात, प्रतिवर्तित होतात.

11. हिशेबाची पुस्तके तपासण्याचा अधिकार :

कलम 209 (4) नुसार, संचालक हिशेबाची पुस्तके तपासू शकतात. कलम 209 (4) मध्ये तरतूद केली आहे की, "हिशेबाची पुस्तके कार्यालयीन वेळेत एखाद्या संचालकाला तपासण्यासाठी खुली ठेवली जातील."

12. ताळेबंद/नफा-तोटा खातेसंबंधी तरतुदीत परिवर्तन करण्यासाठी अर्ज करण्याचा अधिकार :

कलम 211 (4) मध्ये अशी तरतूद केली की, संचालक मंडळ केंद्र सरकारकडे त्यांच्या कंपनीच्या संदर्भात अधिनियमाच्या एखाद्या आवश्यकतेनुसार कंपनीच्या ताळेबंदात किंवा नफा व तोटा खात्यात एखादा विषय नमूद करावयाचा असेल तर परिवर्तनासाठी अर्ज करू शकेल आणि जर केंद्र सरकारला परिवर्तन योग्य आहे असे वाटले तर ते अनुमती देऊ शकते.

## D) संचालकांची कर्तव्ये (Duties of Directors) (कलम 166)

**(अ) वैधानिक कर्तव्ये :**

यामध्ये कंपनी अधिनियमांनी घालून दिलेली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या यांचा समावेश होतो, ते पुढीलप्रमाणे :

1. वाटणीचे परवाने भरणे :

वाटणीचे परवाने निर्दिष्ट तपशील नमूद करून 30 दिवसांच्या कालावधीत भरण्याचे संचालकांचे कर्तव्य आहे. कंपनी अधिनियमाच्या कलम 75 मध्ये ही तरतूद केली आहे. जर संचालकांनी ते कार्य योग्य वेळेत केले नाही तर संचालकांना हलगर्जीपणा करणारे अधिकारी म्हणून जबाबदार धरले जाईल आणि जोपर्यंत संचालक आपल्या कर्तव्याचे उल्लंघन करत राहील तोपर्यंत दररोज 5 हजार रुपयांपर्यंत दंड शिक्षा म्हणून आकारण्यात येईल.

2. अप्रतिदेय पसंत भाग जे 10 वर्षांनंतर विमोचनीय आहेत ते काढू नये :

कलम 80, अधिनियम 1988 ने दुरुस्त केला गेला. कंपनीला अप्रतिदेय अग्रहक्क भाग किंवा अग्रहक्क भाग जे 10 वर्षांनंतर विमोचनीय असतील असे भाग देण्यास कंपनीला बंदी घालतो. जे संचालक असा भाग मिळविण्याचा प्रयत्न करतील ते दोषी ठरविले जातील आणि 10 हजार रुपयांपर्यंत दंडास पात्र राहतील.

3. हितसंबंध उघड करणे (कलम 299 व 300) :

जो संचालक कंपनीच्या व्यवहाराबद्दल स्वारस्य दर्शवित असेल त्याने ते स्वारस्य संचालक मंडळाकडे प्रकट करणे आवश्यक आहे. जर तो एखाद्या कंपनीचा सभासद असेल किंवा व्यापारी संस्थेचा सभासद असेल जिच्याबरोबर कंपनीला व्यवहार करायचा आहे तर त्याने मंडळाला सामान्य नोटीस देऊन आपला हितसंबंध त्या संस्थेत असल्याचे सांगितले पाहिजे अशी नोटीस प्रत्येक वर्षानंतर नव्याने दिली पाहिजे.

4. मालमत्ता हस्तांतरणापासून मिळालेला परतावा उघड करणे (कलम 319) :

प्रत्येक संचालकाचे हे कर्तव्य आहे की, कंपनीच्या मालमत्ता हस्तांतरणामुळे त्याला जर काही पैसे मिळाले असतील तर त्याने त्याविषयी संचालक मंडळास माहिती देणे आवश्यक आहे, अशी प्राप्ती कंपनीच्या सभासदांपुढे प्रकट केली पाहिजे आणि त्यास सर्वसाधारण बैठकीत कंपनीने मान्यता दिली पाहिजे. अन्यथा संचालक अशा रकमेला कंपनीसाठी विश्वस्त निधी म्हणून समजतील.

5. भाग-हस्तांतरणापासून मिळालेली भरपाई उघड करणे (कलम 320) :

कोणत्याही हस्तांतरणाबाबत कोणत्याही कराराला अनुसरून जर ज्याला हस्तांतर झाले त्याच्याकडून संचालकाला एका वर्षाच्या आत हस्तांतरणाच्या अगोदर किंवा दोन वर्षांच्या आत हस्तांतर झाल्यावर जर कोणताही पैसा मिळाला व संचालकाने पद नुकसानासाठी भरपाईच्या मार्गाने तो मिळालेला नाही असे सिद्ध केले नाही तर तो पैसा कंपनीसाठी म्हणून हिशेबात धरला जाईल.

6. संचालक मंडळ सभांना उपस्थित राहण्याचे कर्तव्य :

नियतकालिक मंडळ सभा बैठकीमध्ये संचालकांनी त्याचे कर्तव्य योग्य पद्धतीने पार पाडणे आवश्यक आहे. जरी संचालक मंडळाच्या सर्व सभांच्या हजर राहण्याची अपेक्षा असली तरी तो सर्व मंडळांना बैठकींना उपस्थित राहण्यासाठी बांधील नाही. कलम 283 (ग) अनुसार, मंडळाच्या एका-पाठोपाठच्या तीन बैठकींना किंवा तीन महिन्यांच्या क्रमवार काळातील मंडळाच्या सर्व बैठकींना तो स्वतः गैरहजर राहिला असेल तर, जो काही दीर्घ असेल त्यासाठी बोर्डाकडून गैरहजर राहण्याची परवानगी घेतली नसेल तर त्याला संचालक पदावरून बडतर्फ केले जाऊ शकते. त्यामुळे मंडळाच्या बैठकींना उपस्थित राहणे हे संचालकांचे कर्तव्य आहे.

7. सर्वसाधारण सभा बोलावण्याचे कर्तव्य :

कंपनीच्या विविध सभा बोलावणे हे संचालकांचे कर्तव्य आहे.

8. अहवाल तयार करण्याचे कर्तव्य :

कंपनीच्या प्रगतीचा अहवाल संचालकांना तयार करावा लागतो आणि वार्षिक सर्वसाधारण सभेत कंपनीच्या भागधारकांसमोर तो सादर करावा लागतो. असा अहवाल ताळेबंद आणि नफा-तोटापत्रकासह असलाच पाहिजे.

9. कर्ज फेडण्याच्या क्षमतेचे घोषणापत्रक :

ऐच्छिक समानाच्या सदस्याच्या संदर्भातील कर्ज फेडण्याच्या क्षमतेचे घोषणापत्रक तयार करणे हे प्रत्येक संचालकाचे कर्तव्य आहे.

**(ब) सामान्य/साधारण कर्तव्ये :**

1. काळजीपूर्वक कर्तव्याचे वहन :

संचालकास त्याची कार्ये काळजीपूर्वक पार पाडावी लागतात. त्याला त्याचे कार्य योग्य परिश्रमपूर्वक व खबरदारीने पार पाडण्यासाठी कार्याच्या ठिकाणी हजर राहावे लागते. संचालकाचे पद कोणतेही असले तरी त्यांना पार पाडावी लागणारी कार्ये ही एकसारखी असतात. त्यामुळे कार्यकारी आणि बिगर-कार्यकारी संचालकास त्याची कर्तव्ये योग्य पद्धतीने पार पाडावी लागतात.

2.आपले कार्य दुसऱ्यांवर न सोपविण्याचे कर्तव्य :

संचालकाला कंपनीचा प्रतिनिधी म्हणून कायदेशीर हुद्दा प्राप्त झालेला असल्याने तो आपला प्रतिनिधी नेमू शकत नाही. याचा अर्थ असा होतो की, त्याने त्याची कार्ये करण्याचा अधिकार अधिनियमांना मर्यादित केलेल्या नियमानुसार किंवा कंपनीच्या नियमानुसार पार पाडावी लागतात. त्यामुळे तो आपली कर्तव्ये दुसऱ्यांवर सोपवू शकत नाही.

3. प्रामाणिकपणे कार्य करण्याचे कर्तव्य :

संचालकांनी प्रामाणिकपणे कार्य करावे. त्यांनी त्यांचे कर्तव्य पार पाडताना प्रामाणिकपणे कार्य करण्याची अपेक्षा केली जाते. त्याने कंपनीने दिलेल्या संधीचा स्वतःसाठी वापर करू नये. कंपनीद्वारे दिलेली विश्वासाधिष्ठित कर्तव्ये त्याने योग्य पद्धतीने पार पाडावी. संचालकांनी कोणत्याही प्रकारचा गुप्त नफा मिळवू नये.

**(क) कंपनी अधिनियम, 2013 चे कलम 166 नुसार स्वतंत्र संचालकांची कर्तव्ये :**

(1) या अधिनियमाच्या अधीन राहून कंपनीचा संचालक कंपनीच्या नियमावलीनुसार कार्य करील.

(2) कंपनीचा संचालक एकत्रितपणे तिच्या सभासदांच्या फायद्यासाठी आणि कंपनीच्या तिच्या कर्मचाऱ्यांच्या, भागधारकांच्या, समाजाच्या आणि पर्यावरणाच्या संरक्षणासाठी सर्वोत्तम हितासाठी कंपनीची उद्दिष्टे उन्नत करण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करील.

(3) कंपनीचा संचालक त्याची कर्तव्ये योग्य आणि वाजवी काळजीने, कौशल्याने व परिश्रमपूर्वक पार पाडील आणि स्वतंत्र न्यायनिर्णयाचा वापर करील.

(4) कंपनीचा संचालक अशा परिस्थितीत गुंतला जाऊ नये, जेथे त्याचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष हितसंबंध आहेत. ज्यांचा कंपनीच्या हितसंबंधाशी संघर्ष घडेल किंवा संघर्ष होण्याची शक्यता आहे.

(5) कंपनीच्या संचालकाने कोणताही गैरलाभ किंवा फायदा त्याच्यासाठी किंवा त्याच्या नातेवाइकांसाठी, भागीदारांसाठी किंवा सहकाऱ्यांसाठी मिळविण्याचा किंवा मिळविण्यासाठी प्रयत्न करू नये. जर असा संचालक गैरफायदा मिळविण्याचा प्रयत्न करताना आढळला तर तो त्याने मिळविलेल्या फायद्याइतकी रक्कम कंपनीला देण्यास जबाबदार राहील.

(6) कंपनीच्या संचालकाने त्याच्या पदावर नेमणूक करून आणि कोणतीही अशी केलेली नेमणूक बेकायदेशीर असेल.

(7) जर कंपनीच्या संचालकाने या कलमातील तरतुदींचे उल्लंघन केले तर तो संचालक 1 लाख रुपयांपेक्षा कमी नसलेल्या परंतु 5 लाख रुपयांपर्यंत वाढणाऱ्या दंडाच्या शिक्षेला पात्र राहील.

## E) संचालकाच्या जबाबदाऱ्या/(Liabilities of Directors)

1. अधिकारबाह्य कृत्याबद्दल जबाबदारी :

घटनापत्रकाच्या उद्देश-कलमात कंपनीची उद्दिष्टे दिलेली असतात. त्या उद्दिष्टपूर्ततेसाठी संचालकांना कामे करावी लागतात. उद्देश-कलमाव्यतिरिक्त केलेल्या कामांना अधिकारबाह्य कार्य असे समजले जाते. असे अधिकारबाय कृत्य जर संचालकांनी केले असेल आणि त्यामुळे कंपनीला नुकसान सहन करावे लागले असेल तर अशी नुकसानभरपाई भरून देण्यास संचालक जबाबदार धरले जातात.

2. निष्काळजीपणाबद्दल जबाबदारी :

संचालक कंपनीचे प्रतिनिधी व विश्वस्त म्हणून काम करतात. त्यामुळे कंपनीच्या हितसंबंधांना बाधा येईल व सभासदांचे नुकसान होईल अशी कार्ये संचालकांनी करू नयेत. आपल्या कामामध्ये जर संचालकांनी निष्काळजीपणा, हलगर्जीपणा केला अथवा कुचराई केली आणि त्यामुळे कंपनीचे नुकसान झाले तर त्या नुकसानीची भरपाई करून देण्याची जबाबदारी संचालकावर राहील.

3. विश्वासभंगाबद्दल जबाबदारी :

संचालक कंपनीचे 'विश्वस्त' म्हणून समजले जातात. त्यामुळे कार्ये पार पाडत असताना संचालकांनी जर एखादे विश्वासघाताचे कृत्य केले असल्यास, कंपनीच्या व्यवसायापासून गुप्त नफा मिळविला असल्यास किंवा कंपनीच्या पैशाचा/गुंतवणुकीचा दुरुपयोग केला अथवा आपल्या पदाचा स्वार्थासाठी वापर केला आणि त्यामुळे जर कंपनीला काही नुकसान झाले तर ते भरून देण्याची जबाबदारी संचालकाची राहील.

4. कर्तव्यभंगाबद्दल जबाबदारी :

संचालकांनी आपल्या कर्तव्यात जाणूनबुजून दुर्लक्ष केले आणि त्यामुळे कंपनीला जर काही नुकसान पोहोचले तर त्यातून निर्माण होणाऱ्या जबाबदारीला 'कर्तव्यभंगाबद्दलची जबाबदारी' असे म्हणतात. त्यामुळे कर्तव्यभंगाबद्दल दोषी ठरणाऱ्या संचालकास कंपनीचे वास्तविक नुकसान भरून देण्यास जबाबदार धरले जाते.

5. तृतीय पक्षाबाबतची जबाबदारी :

संचालकांनी प्रामाणिकपणे कंपनीच्या हितार्थ केलेल्या कार्याबद्दल वैयक्तिक दायित्व निर्माण होत नाही. परंतु जर संचालकांनी स्वतःच्या नावाने तृतीय पक्षाशी करार केला असल्यास त्यांचे तृतीय पक्षाबाबत दायित्व निर्माण होते. अशा वेळी तृतीय पक्ष व्यक्तिशः संचालकावर, कंपनीवर अथवा दोघांवरही खटला भरू शकतात.

6. फौजदारी स्वरूपाची जबाबदारी :

कंपनी कायद्यातील विविध तरतुदींचे पालन करणे तसेच कंपनी व्यवसायाशी संबंधित इतर कायद्यातील तरतुदींचे पालन करणे हे संचालकाचे कर्तव्य आहे. जर संचालकांनी या तरतुदींचे पालन केले नाही किंवा त्यांचे पालन करण्यास कुचराई केली तर त्यांना शिक्षा करण्याची तरतूद विविध कायद्यातील कलमामध्ये दिलेली आहे. या कलमानुसार संचालकांची जी जबाबदारी निर्माण होते त्याला 'फौजदारी स्वरूपाची जबाबदारी' असे म्हणतात.

7. संचालकांच्या इतर जबाबदाऱ्या :

(1) खोटी माहिती असलेले माहितीपत्रक सादर केल्यास किंवा लबाडी (Fraud) केल्यास कलम 447 अनुसार जबाबदार संचालकांना किमान 6 महिने कैद किंवा लबाडी केलेल्या व्यवहारात असलेली रक्कमइतका दंड होऊ शकतो. अशी कैद 10 वर्षांपर्यंत आणि रक्कम लबाडीच्या तीनपट इतकी वाढविता येते.

(2) नवीन कंपनी कायदा, 2013 सुरू होण्यापूर्वी स्वीकारलेल्या ठेवी कंपनीने एक वर्षाच्या आत परत केल्या पाहिजेत. अन्यथा, संचालक कलम 447 नुसार वैयक्तिक जबाबदार धरले जातील आणि कलमामध्ये सांगितल्याप्रमाणे कैद किंवा दंड त्यांना होऊ शकतो.

(3) संचालकाने कलम 165 मध्ये सांगितल्यानुसार जर मर्यादेपेक्षा अधिक कंपन्यांचे संचालक घेतले असतील तर तो 500 रुपये दंडास पात्र ठरतो. असा दंड 2,500 रुपयांपर्यंत वाढविला जाऊ शकतो.

(4) जर संचालकांनी संचालक ओळख क्रमांकासंदर्भात असणाऱ्या विशेषतः कलम 155 आणि 156 मधील तरतुदींचे पालन केले नाही तर कलम 159 नुसार जबाबदार संचालकाला 6 महिने कैद अथवा 50 हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

(5) संचालकांनी कंपनीच्या व्यवहारात/करारात असणारे हितसंबंध उघड केले पाहिजेत. (कलम 184) अन्यथा अशा संचालकांना एक वर्ष कैद अथवा 50 हजार रुपयांपर्यंत दंड अथवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

(6) केंद्र सरकारने अधिकार दिलेल्या व्यक्तीला अथवा नोंदणी-अधिकाऱ्याला पुस्तक अथवा दस्त-तपासणीत सहकार्य केले नाही तर जबाबदार संचालकाला 1 लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

(7) हिशेबतपासनिसाला माहिती देण्यास टाळाटाळ केल्यास संबंधित संचालकास एक वर्ष कैद अथवा 10 हजार रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

(8) जर संचालकांनी जाणूनबुजून खोटे विधान (माहिती) केले असेल तर कलम 449 नुसार जबाबदार अधिकाऱ्याला 3 वर्षे कैद किंवा 10 लाख रुपयांपर्यंत दंड अशा शिक्षा होऊ शकतात.

## F) संचालकांना कर्जे (Loans to Directors) (कलम 185)

कंपनीने आपल्या संचालकांना द्यावयाच्या कर्जासंबंधी कलम 185 नुसार पुढील निर्बंध घालण्यात आले आहेत :

(1) कंपनी आपल्या कोणत्याही संचालकांना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे कोणतेही कर्ज देऊ शकत नाही. यामध्ये पुस्तकी क्रयाचा (Book Debt) देखील समावेश आहे.

(2) कंपनी कोणत्याही इतर व्यक्तींना (To any Other Person) की ज्यांच्यामध्ये संचालकांचे हितसंबंध गुंतलेले आहेत (Interested) अशा व्यक्तींना कर्जे देऊ शकणार नाही.

इतर व्यक्ती की ज्यांच्यामध्ये हितसंबंध गुंतलेले आहेत अशा व्यक्ती पुढीलप्रमाणे :

(I) आपल्या संचालकाला अथवा आपल्या सूत्रधारक कंपनीच्या संचालकाला अथवा अशा संचालकाच्या भागीदाराला अथवा नातेवाइकाला;

(II) ज्यात असा संचालक अथवा त्याचा नातेवाईक भागीदार आहे अशा भागीदारी संस्थेला;

(III) असा संचालक ज्या खाजगी कंपनीत सभासद अथवा संचालक आहे अशा खाजगी कंपनीला;

(IV) असा संचालक अथवा एकापेक्षा अधिक संचालक ज्या कंपनीतील सर्वसाधारण सभेत 25% पेक्षा अधिक मताधिकार धारण करतात त्या कंपन्यांनाः

(3) ज्या संचालकांनी अथवा इतर व्यक्तींनी घेतलेल्या कर्जाला कंपनी हमी देणार नाही किंवा कोणत्याही प्रकारची सुरक्षितता उपलब्ध करून देणार नाही.

ज्या कंपनीने कलम 185 (1) मधील तरतुदींचा भंग केला आहे म्हणजेच संचालकांना अथवा इतर व्यक्तींना कर्जे दिली आहेत, हमी दिलेली आहे अथवा सुरक्षितता प्रदान केली आहे अशा कंपनीला किमान 5 लाख रुपये दंड, जो 25 लाख रुपयांपर्यंत वाढविला जाऊ शकतो. तसेच ज्या संचालकांना अथवा इतर व्यक्तींना कर्जे मंजूर झाली आहेत किंवा हमी मिळाली आहे किंवा सुरक्षितता मिळाली आहे अशा संचालकांना अथवा इतर व्यक्तींना 6 महिन्यांपर्यंत कैद अथवा किमान 5 लाख रुपये दंड की, जो 25 लाख रुपयांपर्यंत वाढविला जाऊ शकतो किंवा दोन्हीही शिक्षा होऊ शकतात.

## G) संचालकांचा मोबदला (Remuneration of Directors)

कंपनीच्या व्यवस्थापन कार्यात संचालक आपला वेळ खर्च करतात. म्हणून त्यांच्या सेवेबद्दल त्यांना काही मोबदला देणे आवश्यक असते. सामान्यतः कंपनीच्या सभांना हजर राहिल्याबद्दल त्यांना फी (Director Fee) मिळत असते. तरीदेखील कंपनीच्या संचालकांना द्यावयाचा मोबदला इतर प्रकारेदेखील देता येतो. या संदर्भात कंपनी कायद्यात पुढील तरतुदी आहेत :

(1) संचालकांच्या मोबदल्याबाबत नियमावलीत तरतूद करता येईल किंवा नियमावलीत तरतूद करून तो कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अथवा विशेष ठराव मंजूर करून निश्चित करता येईल.

(2) सार्वजनिक कंपनीच्या संचालकांना (व्यवस्थापकीय संचालक अथवा पूर्ण वेळ संचालक आणि व्यवस्थापक धरून) द्यावयाचा एकूण व्यवस्थापकीय मोबदला कंपनीच्या निव्वळ नफ्याच्या 11 टक्क्यांपेक्षा जास्त असणार नाही.

(3) संचालकांना द्यावयाचा मोबदला त्यांना मासिक वेतनाच्या स्वरूपात देता येईल किंवा निव्वळ नफ्याच्या काही टक्के कमिशन मोबदला म्हणून देता येईल किंवा अंशतः मासिक वेतनाच्या स्वरूपात आणि अंशतः कमिशनच्या स्वरूपात मोबदला देता येईल.

(4) पूर्ण वेळ काम करणाऱ्या एका संचालकाच्या बाबतीत किंवा व्यवस्थापकीय संचालकाच्या बाबतीत किंवा व्यवस्थापकाच्या बाबतीत त्यांना द्यावयाचा मोबदला कंपनीच्या निव्वळ नफ्याच्या 5 टक्क्यांपेक्षा जास्त असणार नाही.

(5) कंपनी कायद्याच्या कलम 197 (5) अनुसार, स्वतंत्र संचालकांना फीच्या स्वरूपात मोबदला देता येणार नाही तसेच ते स्कंध पर्यायालादेखील (Stock Option) पात्र ठरणार नाहीत. संचालक मंडळाला उपस्थित राहिल्याबद्दल होणारा खर्चदेखील त्यांना परत मिळू शकणार नाही (Reimbursement).

(6) जर एखाद्या संचालकाला कायद्यात नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक मोबदला दिला गेला असेल तर त्याने तो जादा मिळालेला मोबदला कंपनीला परत (Refund) केला पाहिजे.

(7) केंद्र सरकारच्या पूर्वसंमतीशिवाय उपकलम (9) प्रमाणे कंपनी असा जादा दिलेला मोबदला सूट (Waive) सोडून देऊ शकणार नाही.

(8) भागबाजारात नोंद झालेल्या प्रत्येक कंपनीने आपल्या संचालक मंडळाच्या अहवालात प्रत्येक संचालकाच्या मोबदल्याचे सर्वसाधारण कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या मोबदल्याशी किती प्रमाण (Ratio) आहे ते उघड केले पाहिजे.

(10) जर कंपनीने व्यवस्थापकीय संचालक, पूर्ण वेळ संचालक, व्यवस्थापक, मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO), मुख्य वित्त अधिकारी (CFO) अथवा कंपनी सेक्रेटरी यांच्याकडून जर निष्काळजीपणामुळे, चुकीमुळे, विश्वासघातामुळे, कर्तव्यभंगामुळे जर काही नुकसान झाले तर ते भरून निघावे म्हणून विमा घेतला असेल तर त्याचा हप्ता (Premium) हा मोबदल्याचा भाग समजला जाणार

नाही. परंतु जर एखादी अधिकारी व्यक्ती पुराव्यासह दोषी आढळली तर मात्र कंपनीने भरलेला हप्ता हा संबंधित संचालकांना द्यावयाच्या मोबदल्याचा भाग (Part) समजला जाईल.

(11) सदर कलमातील तरतुदींच्या अधीन राहून संचालक, व्यवस्थापकीय संचालक अथवा पूर्ण वेळ संचालक हे कोणत्याही सूत्रधारक कंपनीकडून अथवा सदरहू कंपनीच्या सहायक कंपनीकडून मिळणाऱ्या मोबदल्याला अथवा कमिशनला अपात्र ठरणार नाही.

(12) जर कोणी या कलमातील तरतुदींचा भंग केला तर संबंधित व्यक्ती किमान 1 लाख रुपयांपर्यंत दंडास पात्र ठरेल. दंडाची रक्कम 5 लाख रुपयांपर्यंत वाढविली जाऊ शकते.

(13) जर एखाद्या आर्थिक वर्षात कंपनीला नफा झाला नाही अथवा पुरेशा प्रमाणात झाला नाही तर व्यवस्थापकीय व्यक्तींना मिळून पुढीलप्रमाणे मोबदला दिला जाईल:

| **कंपनीचे प्रभावी (Effective) भांडवल** | **वार्षिक अधिकतम मोबदला** |
|---|---|
| 1. जर कंपनीचे प्रभावी भांडवल काहीच नसेल किंवा 5 कोटी रुपयांपेक्षा कमी असेल तर. | ₹ 30 लाख |
| 2. जर कंपनीचे प्रभावी भांडवल 5 कोटी रुपयांपेक्षा जास्त परंतु 100 कोटींपेक्षा कमी असेल तर. | ₹42 लाख |
| 3. जर कंपनीचे प्रभावी भांडवल 100 कोटी रुपयांपेक्षा जास्त परंतु 250 कोटी रुपयांपेक्षा कमी असेल तर | ₹ 60 लाख . |
| 4. जर कंपनीचे प्रभावी भांडवल 250 कोटी रुपये अथवा अधिक असेल तर. | \| 60 लाख रुपयांपेक्षा अधिक आणि 250 कोटी रुपयांपेक्षा अधिक असणाऱ्या प्रभावी भांडवलाच्या 0.01%. |

जर भागधारकांनी या संदर्भात विशेष ठराव मंजूर करून घेतला असेल तर वरील मर्यादेच्या रकमा दुप्पट (Doubled) असू शकतील. एक वर्षापेक्षा कमी कालावधीच्या प्रमाणात निश्चित होतील.

जर एखादी व्यवस्थापकीय व्यक्ती नियुक्तीपूर्वी दोन वर्षे आधीपासून कंपनीची 5 कोटी रुपये किंवा अधिक किमतीच्या प्रतिभूती (Securities) धारण करणारी नसेल किंवा कंपनीची कर्मचारी अथवा संचालक किंवा प्रवर्तकाशी संबंधित नसेल (Not Related) तर ही मर्यादा दुप्पट (5%) होईल.

व्यवस्थापकीय व्यक्तींना मिळणाऱ्या सोईसवलती (Perquisites) त्यांच्या वरील मोबदल्याच्या मर्यादेमध्ये समाविष्ट होणार नाहीत, ते पुढीलप्रमाणे :

(1) प्रॉव्हिडंट फंड अथवा सुपर एन्शुएशन फंडाला किंवा वार्षिक फंडाला आयकर करमुक्त मर्यादेपर्यंत दिलेले योगदान.

(2) पूर्ण वर्ष सेवा केलेल्या वर्षाला दीड महिन्याच्या पगाराइतकी ग्रॅच्युइटीची रक्कम.

(3) मुदत संपल्यानंतर रजेचे रोख रकमेत रूपांतर.

वरील सोईसवलतींशिवाय व्यवस्थापकीय व्यक्तींना आणखी पुढील सवलती मिळू शकतील व त्या देखील व्यवस्थापकीय मोबदल्याच्या अधिकतम (Maximum) रकमेत मोजल्या जाणार नाहीत.

(1) मुलांचा शिक्षण हप्ता :

जर संबंधित व्यक्तीचा मुलगा परदेशात शिक्षण घेत असेल किंवा भारतात शिक्षण घेत असेल तर एका मुलासाठी महिन्याला ₹ 12,000 किंवा प्रत्यक्ष झालेला खर्च जो कमी असेल तो आणि जास्तीतजास्त दोन मुलांसाठी शिक्षण भत्ता म्हणून मंजूर होऊ शकेल.

(2) भारताबाहेर राहणाऱ्या मुलांसाठी किंवा कुटुंबासाठी सुट्टीत येण्याची सवलत :

वर्षातून एकदा साध्या वर्गाने किंवा दोन वर्षातून एकदा प्रथम वर्गाने (First Class) विदेशातून आपल्या देशात सुट्टीत येण्यासाठी (जर ते भारतात राहत नसतील तर) त्यांना प्रवासभाडे मिळू शकेल.

(3) सुट्टीतील रजा-प्रवास सवलत (LIC) :

कंपनीने निश्चित केलेल्या दराने सुट्टीत स्वतःला किंवा कुटुंबाला भारतात कोठेही फिरण्यासाठी प्रवास-भाडे मिळू शकेल.

---

संदर्भ ग्रंथ :-


- कंपनी कायद्याचे घटक -I -डॉ. गोविंद डुंबरे ,डॉ. शिवाजी टाकळकर ,डॉ. आशा कदम-पेंढारी
- कंपनी कायद्याची मुलतत्वे – प्रा. सुरेश भिरूड आणि इतर
- कंपनी कायद्याची मुलतत्वे(भाग १) – डॉ. धीरज झाल्टे आणि इतर
- Elements of Company Law - Sultan Chand & Sons
- Elements of Company Law - N.D. Kapoor
- Elements Of Company Law- Prof. Prakash N. Chaudhary